ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३७ पुणे, बुधवार, ३ मार्च, १९७१ अंक ५



## अवकाश संशोधनातील स्पर्धा

अमेरिका आणि रशिआ हे दोन बडे देश अवकाश संशोधनातील स्पर्धेत गुंतले आहेत. त्यांच्या संशोधनाचे हेतू आणि पद्धत वेगळी असल्याने महत्त्वमापनाची एकच कसोटी लावता येणार नाही. तथापि आकडेवारीत काही तुलना अशी करता येते.

| | अमेरिका | रशिआ |
|---|---|---|
| मानवसहित उपग्रह | २४ | १६ |
| एकापेक्षा अधिक समानव उपग्रह | १८ | ७ |
| चंद्राच्या दिशेने प्रवास | ६ | — |
| चंद्रावर पदार्पण | ३ | — |
| अंतरिक्षातील प्रवास | ७,९७० तास | २,५४९ तास |
| अंतरिक्ष प्रवासी | ५० | २६ |
| अंतरिक्षात चालणे | १६ वेळा | ३ वेळा |
| अंतरिक्षात याने जोडणे | १४ वेळा | १ वेळा |

## चंद्रपृष्ठावरील धूळ उत्तम प्रतीचे खत

चंद्राच्या पृष्ठभागावरील खडक व धूळ अमेरिकेच्या चांद्रवीरांनी पृथ्वीवर आणली. त्यानंतर दुसऱ्या ग्रहावरील ह्या खडकाची शास्त्रीय तपासणी होऊ लागली. शास्त्रीय संशोधनाची ही मोहीम अनेक हेतूंनी करण्यात येत आहे. संशोधकांना असे आढळून आले आहे की चंद्रावरून आणलेली माती ही उत्तम प्रकारचे खत होऊ शकेल. अर्थात अशा खताची किंमत फारच महाग पडेल. काही वनस्पतीवर चंद्रावरील माती फवारण्यात आली आणि काही वनस्पती नेहमीप्रमाणेच वाढू देण्यात आल्या. प्रयोगाअंती असे दिसून आले की चंद्रावरील माती फवारलेल्या वनस्पतींची वाढ अधिक त्वरेने झाली आणि त्यांच्या पानाचा हिरवा रंगही अधिक गडद झाला. त्या मानाने नैसर्गिक रीत्या वाढणाऱ्या वनस्पती सावकाश वाढल्या. जीवशास्त्रज्ञांना हे प्रयोग विशेष महत्त्वाचे वाटत आहेत.

## छोट्या उद्योगधंद्यांकडे परदेशी विचारणा

भारताच्या निर्यात व्यापारात मोठ्या उद्योगधंद्याप्रमाणेच छोटे उद्योगधंदेही कामगिरी बजावू शकतात. औद्योगिक दृष्ट्या प्रगत असलेल्या देशातूनही ह्या धंद्यात निर्माण होणाऱ्या मालासाठी विचारणा होत असतात. इटलीमधील एका मोठ्या मोटार कारखान्याने मोटारींच्या सुट्या भागासाठी भारताच्या छोट्या उद्योगधंद्यांच्या कमिशनरकडे विचारणा केली आहे. विचारणा फलद्रूप झाल्यास भारताला ३·७५ कोटी रुपयांचे मोटारीचे भाग निर्यात करता येतील. इटलीप्रमाणेच जपानकडून काही प्रकारच्या मालाबाबत विचारणा करण्यात आली होती. जपानला भारताकडून सायकली, शिवणाची यंत्रे, कापड गिरण्यांची यंत्रसामग्री, इत्यादी माल हवा आहे. सुमारे ५८ कोटी रुपये किमतीचा माल जपान घेऊ शकेल.


स्थापना १९११
माकडछाप

म्हणजेच
काळी टूथपावडर
नोगी आणि कंपनी प्रा. ली.
मुंबई ६९ ओ. ओस.
सोल सेलींग ओजन्टस्
नोगी सेल्स् कॉर्पोरेशन
१७० जगन्नाथ शंकरशेठ रोड, मुंबई ४. बी आर.
MARATHI

मी आता पूर्ण समाधानी आहे!
कारण...

(मावळा, सातारा)
मासिक - व्याज ठेव योजना
रुपये ४००० ठेव ठेवा आणि दरमहा रुपये २५ व्याज घ्या
ह्यापेक्षा जास्त रक्कम एक हजाराच्या पटीत ठेवल्यास
दर हजारी रु. ६·२५ महिना अधिक मिळतील
मासिक व्याज ठेव योजना बहुअंगी उपयुक्त आहे.
बँकेच्या शाखेत भेटा अगर पत्रद्वारे माहिती पत्रक मागवून घ्या.
रक्कम गुंतवा आणि निर्धास्त रहा.
दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
मुख्य कचेरी :- चिरमुले निकेतन, राजपथ, सातारा.
महाराष्ट्रांत ५० शाखा

☆ अर्थ ☆

बुधवार, ३ मार्च, १९७१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## चलनवृद्धी विरुद्ध धोक्याचा गंभीर इशारा

मुंबई येथील सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स मध्ये बोलताना रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर श्री. एच. व्ही. आर. अय्यंगार ह्यांनी आर्थिक भवितव्याविषयी धोक्याचा इशारा दिला आहे. ते आपल्या भाषणात म्हणाले, की सध्याप्रमाणेच चलनवृद्धी होत राहिली आणि किमतीची पातळी अशीच वाढत गेली तर भारताच्या रुपयाचे आणखी अवमूल्यन करण्याचा अनावस्था प्रसंग ओढवण्याची शक्यता आहे. रुपयाचे आणखी अवमूल्यन करण्यात आले तर देशाचे भवितव्य चिंताजनक होईल. १९६६ साली रुपयाचे बऱ्याच प्रमाणात अवमूल्यन करण्यात आले होते. त्यामुळे भारताला आपली निर्यात टिकविण्याच्या कामी मदत झाली असली तरी त्याचा दुसरा परिणाम स्थानिक किमती वाढण्यात झाला. १९४७ साली रुपयाची जी खरेदीशक्ती होती तिच्या मानाने आजची खरेदीशक्ती एकतृतीयांश अगर एकचतुर्थांश इतकीच राहिली आहे. ही बाब तर गंभीर आहेच, पण ह्याहीपेक्षा काळजी वाटण्यासारखी परिस्थिती सतत वाढत जाणाऱ्या किमतींनी उत्पन्न केली आहे. १९५५–५६ मधील अल्प काळ सोडला तर किमती सारख्या वाढत असून त्या उतरण्याची लक्षणे कोठेही दिसत नाहीत.

चलनवृद्धी ही जगातील सर्वच देशांत दिसून येते ही गोष्ट खरी आहे. विकास पावलेले देश आणि विकसनशील देश दोघेही चलनवृद्धीच्या तावडीत सापडलेले आहेत. पण, विकास पावलेल्या देशात चैनीच्या वस्तूंच्या किमती वाढत गेलेल्या दिसतात. उलट, भारतासारख्या विकसनशील देशात जीवनाला आवश्यक असणाऱ्या अन्न, वस्त्र आणि जागा ह्यांच्या किमती वाढत चालल्याने लोक त्रस्त झालेले आहेत. म्हणूनच विकसनशील देशातील चलनवृद्धीमुळे आर्थिक विकासाला चालना मिळते असा युक्तिवाद करण्यात येत असतो; पण ही उपपत्ती पूर्णपणे खोट्या समजुतीवर आधारलेली आहे.

भारतामधील आर्थिक घडामोडी ह्या युक्तिवादाला चोख उत्तर देणाऱ्या ठरल्या आहेत. भारत सध्या चलनवृद्धीच्या तडाख्यात सापडलेला आहे आणि तरीही उद्योगधंद्यांच्या वाढीचा वेग त्याच वेळी मंदावलेला दिसून येत आहे. शेतीच्या उत्पादनाच्या दृष्टीने गेली तीन-चार वर्षे सतत चांगली गेली आहेत आणि ग्रामीण भागातील लोकांच्या हातात असलेला पैसा वाढलेला आहे. तरीही आर्थिक वाढीचा वेग कमी झालेला आहे. भारताच्या आर्थिक नियोजनाला यश येण्यासाठी बचतीचा दर १४ ते १५ टक्क्यांपर्यंत वर जाण्याची आवश्यकता आहे. पण बचतीचा दर वाढण्याचे दूरच राहिले. उलट, १० टक्क्यांपर्यंत वर आलेला हा दर अलीकडे घसरत चालण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. ह्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. कारण, चलनवृद्धीमुळे बचत करण्याच्या प्रवृत्तीला पायबंद बसतो. बचत केलेल्या पैशाची खरेदीशक्ती घसरत जाते ह्या अनुभवामुळे लोक हाती आलेला पैसा चालू घडीला उपयुक्त असणाऱ्या उपभोग्य मालावर खर्च करू लागतात. बचत करण्याच्या भानगडीत पडत नाहीत.

---

### कलकत्त्यामधील गुंडागिरीचा उद्बोधक अभ्यास

बंगाल चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ह्या संघटनेने कलकत्ता शहरातील गुंडगिरीचा आणि त्यांच्या संघटनांचा अभ्यास करून तयार केलेला अहवाल उद्बोधक आहे. कलकत्ता शहरातील घडामोडींवर गुंडगिरीचा कसा व किती प्रभाव पडलेला आहे ते अहवालावरून दिसून येते. त्याचबरोबर ह्या गुंडांच्या बळाची कल्पनाही त्यावरून येते. शहरातील गुंडांच्या टोळ्यांत अनेक धंदे करणारे लोक आहेत. घरातून बाहेर पडलेली तरुण मुले त्यात दिसून येतात, तसेच रेल्वेच्या वाघिणी फोडून माल लुटणारेही आढळून येतात. समाजातील संघटित जीवनावर त्यांचा परिणाम खूपच पडू लागला आहे. खेळ खेळणारे क्लब, शाळा, कॉलेजे व इतर शैक्षणिक संघटना, विद्यार्थ्यांच्या संघटना, कामगार संघटना, राजकीय पक्ष, ह्या सर्वांपर्यंत त्यांचे हात पोचले आहेत. त्यांच्या जाळ्यातून जवळ जवळ कोणतीच सामाजिक संघटना सुटलेली दिसत नाही. ह्या संघटित गुंडगिरीने पहिला बळी घेतलेला आहे, तो शहरातील शांतता आणि सुव्यवस्थेचा. सामाजिक जीवनात एक प्रकारचे अराजक माजल्यामुळे औद्योगिक आणि व्यापारी जीवनावर फारच अनिष्ट परिणाम झाला आहे. पण सर्वांत चिंतनीय बाब ही आहे, की समाजविरोधी गुंडांनी राजकीय पक्षांशी आणि गटांशी हातमिळवणी करण्यात यश मिळविले आहे. त्यातही अतिरेकी, डाव्या राजकीय गटांशी त्यांची विशेष दोस्ती दिसून येते. बहुतेक सर्व गुंडांजवळ सुरे आणि हातबाँब असतात. ज्याच्यावर हल्ला करावयाचा तो माणूस दुर्बल असेल आणि सहज हाती लागण्यासारखा असेल तर गुंड चाकूसुऱ्यांचा उपयोग करतात. इतर वेळी बाँबचा उपयोग करण्यात येतो.

सोडा वॉटरच्या बाटल्या झपाट्याने फेकण्यात हे गुंड सराईत झालेले आहेत. त्यांच्यापैकी काही तर इतके तरबेज झालेले आहेत की, एका मिनिटात १० बाटल्या फेकून समोरच्या जमावाला जागच्या जागी खिळविण्याची करामत ते करू शकतात. बहुतेक गुंडांना घर नसतेच. त्यांची वस्ती बहुधा झोपडपट्टयांतून असते. त्यांच्यातील एखाद्याजवळ पिस्तूल अगर रिव्हॉल्वर असल्यास त्याचा विशेष दबदबा असतो. गुंडांच्या जगात असा मनुष्य इभ्रतदार समजला जातो. गुंडांना रोजगारी मिळत नसल्याने वेळ भरपूर असतो. व्यापाऱ्यात काही व्यापारी वेडेवाकडे व्यवहार करणारे असतात. असे व्यापारी गुंडांना भरपूर मेहनताना देऊन आपले व आपल्या धंद्यांचे संरक्षण करून घेतात. म्हणजे, बेकायदा व्यापार-धंद्याचे मोठे पाठीराखे म्हणून गुंडांना चांगला भाव प्राप्त झाला आहे.

---

## गुजरातच्या अर्थव्यवस्थेत खनिज तेलाचे वाढते महत्त्व

गुजरात राज्याच्या अर्थव्यवस्थेत अलीकडे महत्त्वाचा फरक पडत चालला आहे. आजच्या गुजरातमध्ये खनिज तेल व नैसर्गिक वायू वाहून नेणारे नळ जास्त जास्त दिसू लागले आहेत. ह्या राज्याच्या अर्थव्यवस्थेत कापड गिरण्यांना आजपर्यंत फार महत्त्व होते. पण आता खनिज तेलाच्या उत्पादनाच्या धंद्याने आघाडी मारण्यास प्रारंभ केला आहे. आसाम प्रमाणेच गुजरात राज्यातही भूमिगत तेलाचे साठे मुबलक आढळून येतात. ह्या साठ्यांचा उपसा जसजसा होऊ लागेल तसतसे गुजरातचे आर्थिक चित्र बदलू लागेल. गेल्या काही वर्षांत राज्याला तेलाच्या व नैसर्गिक वायूच्या उत्पादनावर मिळणाऱ्या रॉयल्टीची रक्कम वाढत चालली आहे. १९६८-६९ साली राज्याला रॉयल्टीच्या रूपाने १० कोटी रुपयांचे उत्पन्न झाले. खंबायतच्या आखातातील समुद्र किनाऱ्याजवळ तेलाचे नवे साठे हुडकण्याचे काम चालू आहे. ह्या कामात यश आल्यास खनिज तेलावर आधारलेल्या उद्योगधंद्यांना राज्यात फार मोठा वाव मिळेल. बडोद्याजवळील गुजरात तेलशुद्धी कारखाना ह्या नव्या उद्योगधंद्यातील पहिले पाऊल म्हटले पाहिजे. ह्या कारखान्याला अंकलेश्वर तेलखाणीपासून अशुद्ध तेलाचा पुरवठा होतो. १९६५ मध्ये ह्या कारखान्याची उभारणी झाली आणि मग लवकरच जवळच एक खताचा कारखानाही उभारण्यात आला. आता बडोद्याजवळ एक खनिज तेल-रासायनिक कारखान्यांचे जाळे उभारण्यात येत आहे. त्यांच्या स्थापनेसाठी सुमारे ५ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. हे कारखाने सार्वजनिक मालकीच्या विभागात खोलण्यात येत असले तरी खाजगी मालकीच्या कारखान्यांनाही थोडासा वाव देण्यात येणार आहे.

---




तापल्या
लोखंडावर
घाव घाला...

या म्हणीची व्याप्ती फार मोठी आहे. पैशाचेच उदाहरण घ्या. नुसता मुबलक पैसा असून उपयोगी नाहीं. उत्पादनक्षम उद्योग-धंद्याची यशस्वीता पैशाची वेळेवर तरतूद होण्यावर अवलंबून आहे. तसेच लघुउद्योगधंदा करणारास अगर स्वतःचा धंदा असणाऱ्या कारागीरास आपल्या तांत्रिक ज्ञानाबरोबरच तज्ञांकडून आर्थिक बाबीसंबंधीहि कळकळीच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. याची जाणीव होते.

यांसाठीं बॅंक ऑफ इंडीयाच्या नजिकच्या शाखेत विचारणा का करीत नाहीं?

बॅंक ऑफ इंडिया

RAAS/B/127 BMAR

# कै. द. दि. ऊर्फ मामासाहेब चितळे यांचा प्रथम स्मृतिदिन

### पुणें सहकार प्रशिक्षण केंद्रास सत्कार समितीची रु. ३००० ची उदार देणगी

पुण्यातील सुप्रसिद्ध सहकारी कार्यकर्ते, कै. द. दि. ऊर्फ मामासाहेब चितळे ह्यांचा प्रथम स्मृतिदिन दि. १६ फेब्रुवारी रोजी सहकारी प्रशिक्षण केंद्रात कै. मामासाहेब चितळे सत्कार समिती, कै. मामासाहेबांचे आप्तेष्ट व चहाते आणि सहकार प्रशिक्षण केंद्र ह्यांच्या वतीने पाळण्यात आला. माननीय श्री. व्ही. बी. कुंभारे, सह. निबंधक, सहकारी संस्था ( प्रशासन ), महाराष्ट्र राज्य, हे अध्यक्ष-स्थानी होते.



पुणे सहकारी प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य श्री. पां. शं. क्षीरसागर, यांनी आपल्या प्रास्तविक भाषणात केंद्र आणि कै. मामासाहेब चितळे यांच्या घनिष्ट संबंधाबद्दलची माहिती दिली आणि त्यांनी सहकारी चळवळीत केलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा घेऊन कै. मामासाहेबांच्या कार्याचे चित्र उपस्थितांपुढे उभे केले. या वेळी ते म्हणाले, "पुणे शहरातील सहकारी चळवळ वाढविण्याला कै. मामासाहेबांचे परिश्रम प्रामुख्याने कारणीभूत आहेत. शहरातील सहकारी बँकिंग क्षेत्र त्यांच्या प्रयत्नांमुळेच रुजले, वाढले व बहरले आहे. प्रामाणिकपणा, निगर्वी स्वभाव आणि सहकाराची आत्यंतिक आवड हे कै. मामासाहेबांचे विशेष गुण होते. सहकारासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. सहकारी शिक्षणाचे कार्यात एक तपाहून अधिक काळ त्यांनी व्यतीत केला. या काळात त्यांनी सहकारी शिक्षणाचे काम निर्वेतन केले आणि म्हणूनच त्यांची स्मृती जतन करणे हा केवळ त्यांचाच नव्हे, तर सहकारी चळवळीचा गौरव आहे."

यानंतर स्मृतिदिनाचे मुख्य पाहुणे श्री. बी. व्ही. कुंभारे, यांच्या हस्ते कै. चितळे यांच्या छायाचित्राचे अनावरण केंद्राच्या सभागृहात करण्यात आले. सदर छायाचित्र 'चितळे सत्कार समितीने' केंद्रास भेट दिले आहे.

"कै. मामासाहेब हे वक्तशीरपणाच्या बाबतीत आधुनिक काळातील रावसाहेब मंडलीक होते" असे सहकार प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. स. र. जोग हे आपल्या भाषणात म्हणाले.

यानंतर कै. मामासाहेब चितळे सत्कार समितीतर्फे, पूना अर्बन को-ऑप. बँकेचे डॉ. व्ही. आर. ढमढेरे यांनी सत्कार समितीच्या कार्याची कल्पना दिली आणि सत्कार समितीच्या वतीने मुख्य पाहुण्यांच्या हस्ते त्यांनी पुणे सहकार प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य पां. शं. क्षीरसागर, यांना रुपये तीन हजारांचा चेक देणगी म्हणून दिला. या रकमेतून, डिप्लोमा परीक्षेत पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाने 'सहकार' या विषयात उत्तीर्ण होणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना कै. मामासाहेब चितळे यांच्या स्मृत्यर्थ पारितोषिके दिली जावयाची आहेत.

सहकारी क्षेत्रातील कै. मामासाहेबांच्या काही सहकाऱ्यांच्या भाषणानंतर आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. कुंभारे यांनी 'सहकारी चळवळीतील संदर्भ व्यक्ती' या शब्दांत कै. मामासाहेबांचा गौरव केला व थोर कार्यकर्ते कै. वैकुंठभाई मेहतादेखील त्यांचा सल्ला घेत असत असे सांगितले. वक्तशीरपणा, स्पष्टवक्तेपणा, प्रामाणिकपणा, ह्या त्यांच्या गुणांचा त्यांनी आदरपूर्वक उल्लेख केला.

---

### सहकारी संघटनांची विविध क्षेत्रांतील प्रगती

राष्ट्रीय सहकार विकास मंडळाने देशातील सहकारी संघटनांचा अलीकडे एक आढावा घेऊन मूल्यमापन केले आहे. त्यावरून सहकारी संघटनांच्या विविध क्षेत्रांतील प्रगतीची चांगली कल्पना येते. गेल्या सात वर्षांच्या अवधीत शेतीच्या मालाला बाजारपेठा मिळवून देण्यात सहकारी संघटनांनी बरीच मजल मारली आहे. त्यांच्यातर्फे बाजारात येणाऱ्या मालाची तिपटीने वाढ झाली आहे. १९६१-६२ साली १७५ कोटी रुपयांचा माल त्यांनी बाजारात आणला होता तर १९६८-६९ साली ५८८ कोटी रुपयांचा माल त्यांनी बाजारात आणलेला दिसून येतो. त्यातही अन्नधान्याच्या विक्रीच्या बाबतीत विशेष कामगिरी केल्याचे दिसते. शेतमालावर संस्करण करणाऱ्या औद्योगिक संघटनांच्या बाबतीतही पुढे पाऊल पडले आहे. १९६१-६२ साली अशा संघटनांची संख्या ५६१ होती ती १९६९-७० साली १,७५९ पर्यंत वाढली. भात सडण्याच्या गिरण्या १९६१-६२ साली १६४ होत्या, त्यांची संख्या १९६९-७० सालात ७७० पर्यंत वाढली. त्यामुळे भात सडण्याची क्षमता २७ लाख टनांइतकी झाली आहे. सध्या साखरेच्या उत्पादनापैकी ३३ टक्के उत्पादन सहकारी साखर कारखान्यांतर्फे होत आहे. परवाने देण्यात आलेले सर्व सहकारी साखरकारखाने उत्पादन करू लागले म्हणजे एकूण उत्पादनाच्या ४४ टक्के साखर सहकारी कारखाने निर्माण करू लागतील. १९६१-६२ साली ३२·७ कोटी रुपयांच्या रासायनिक खताचे वाटप सहकारी संस्थांमार्फत झाले होते. १९६९-७० साली ह्या संस्थांनी २३२·४ कोटी रुपयांचे, म्हणजे एकूण वाटपाच्या ५५ टक्के खताचे वाटप केले.

---

### पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

१९७०-७१ सालाकरिता, आमदार श्री. साहेबराव माधवराव हे सातकर हे अध्यक्ष म्हणून व श्री. दत्तात्रय लक्ष्मण पारखी हे उपाध्यक्ष म्हणून, पुन्हा अविरोध निवडून आले आहेत.

## हैड्रोजन बॉंबच्या शक्तीचा विजेच्या निर्मितीसाठी उपयोग


औद्योगिक शक्ती निर्माण करण्याच्या कामी हैड्रोजन बॉंबच्या स्फोटाची शक्ती वापरता येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. स्फोटामुळे होणाऱ्या प्रचंड शक्तीवर नियंत्रण ठेवता आले तर औद्योगिक शक्ती निर्माण करण्याचे एक नवीन साधन हाती येईल हे शास्त्रज्ञ जाणून होते. परंतु नियंत्रणाचे तंत्र अवगत करण्याचे आजवरचे प्रयत्न यशस्वी झालेले नाहीत. अमेरिकेतील प्रिन्सटन विद्यापीठात अलीकडे काही नवीन प्रयोग करण्यात आले. त्यावरून असा संभव निर्माण झाला आहे की १९७५ च्या सुमारास हैड्रोजन बॉंबच्या शक्तीचा उपयोग इतर औद्योगिक शक्तीप्रमाणे होऊ शकेल. ही शक्यता व्यवहारात उतरल्यास अमेरिकेत येत्या १५ वर्षांच्या आत ह्या शक्तीचा उपयोग वीज उत्पन्न करण्यासाठी होऊ लागेल. सूर्य आणि तारे ह्यांवर होणाऱ्या उष्णताजनक प्रक्रियेचा नव्या वीज उत्पादनकेंद्रात उपयोग करून घेण्यात येईल. जळण म्हणून हैड्रोजन वापरण्यात येईल. समुद्रापासून ह्या जळणाचा भरपूर आणि स्वस्त पुरवठा होण्यासारखा आहे. शिवाय ह्या नव्या पद्धतीच्या औद्योगिक शक्तीचा एक विशेष असा आहे की तिच्या वापरामुळे भौतिक परिस्थितीत दूषित धूलिकण पसरणार नाहीत. सध्या वापरात असलेल्या औद्योगिक जळणामुळे जगभर हवा, पाणी आणि अनुषंगाने जमीनही दूषित होत आहे. त्यामुळे माणसाच्या जीवनावर विपरीत परिणाम घडून येण्याचा इषारा अनेक शास्त्रज्ञांनी दिलेला आहे. हैड्रोजन बॉंबच्या स्फोटाची शक्ती विधायक कामासाठी वापरणे शक्य झाले तर जगातील अनेक बिकट प्रश्न सुटण्यास महत्त्वाची मदत होणार आहे. पण तो दिवस अद्याप उजाडावयाचा आहे.

---

## सुगंधी तेलाची निर्यात

अनेक प्रकारच्या मूल्यवान अत्तरांची निर्मिती भारतात होते. परंतु ह्यांपैकी फारच थोडी अत्तरे परदेशांत निर्यात केली जातात. अत्तरे तयार करण्यासाठी लागणारी सुगंधी तेले मात्र भारतामधून मोठ्या प्रमाणावर निर्यात करण्यात येतात. गेल्या वर्षी १ कोटी रुपयांची सुगंधी तेले परदेशांना निर्यात करण्यात आली. सुगंधी तेले तयार करण्यासाठी लागणारा 'लेमन ग्रास' सारखा कच्चा माल भारतात होतो. पण त्यांचा उपयोग करून सुवासिक अर्क तयार करण्याचे काम मात्र करण्यात येत नाही. परदेशात अशा अर्कांना अगर सेंट्सना चांगली मागणी असते. अलीकडे एका फ्रेंच कंपनीने भारतामधील लेमन ग्रासच्या तेलाचा उपयोग करून एक नवा सेंट तयार केला आहे. प्रसाधनाची साधनेही अशीच तयार करण्यात येतात.

---




## तेलासाठी अधिक परदेशीय चलन द्यावे लागणार

इराणच्या आखाताच्या परिसरातील खनिज तेलाने समृद्ध असलेले देश आणि ह्या तेलाचा उपसा करून तेलजन्य पदार्थ तयार करणाऱ्या कंपन्या ह्यांच्या दरम्यान अलीकडे एक नवा करार करण्यात आला. अमेरिका व पश्चिम युरोपातील देश ह्यांना तेलाचा पुरवठा ह्याच कंपन्या मोठ्या प्रमाणावर करतात. भारतालाही अजून अशुद्ध तेलाची आयात करावी लागते. इराणच्या आखाताच्या आसमंतामधील देशांनी अशुद्ध तेलाच्या दर पिंपामागे अधिक रॉयल्टीची मागणी केली आणि तेल कंपन्यांनी वाटाघाटी करून अखेर त्यांची मागणी काही प्रमाणात मान्य केली. ह्याचा परिणाम म्हणून तेल आयात करणाऱ्या इतर देशांप्रमाणे भारतालाही त्यासाठी अधिक किंमत द्यावी लागणार आहे. म्हणजेच पर्यायाने भारताच्या परदेशीय चलनांच्या प्राप्तीतून अधिक हिस्सा तेलासाठी द्यावा लागणार आहे. ह्या नव्या घडामोडीमुळे होणाऱ्या किंमतीच्या वाढीची नीटशी कल्पना अद्याप आलेली नाही. कारण तेल-उत्पादक देश आणि कंपन्या ह्यांच्या दरम्यान झालेल्या कराराचा तपशील अजून सरकारच्या हाती आलेला नाही. तथापि तेलाच्या किमती दर पिंपामागे सुमारे २० सेंटनी वाढतील असा अंदाज करण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेलाच्या किमती अलीकडे घसरू लागल्या होत्या. परंतु तेहरान येथे करण्यात आलेल्या नव्या करारामुळे त्या आता वाढू लागतील. हा करार होण्यापूर्वीच भारत सरकार आणि तेल आयात करणाऱ्या परदेशी कंपन्या ह्यांच्यात सध्याच्या किमती वाढवून देण्यासाठी वाद चालू होता. त्याचा निकाल लागेपर्यंत भारत सरकार अशुद्ध तेलाच्या आयातीसाठी परदेशी कंपन्यांना दर पिंपामागे १·२८ डॉलर्स ह्याच दराने परदेशीय हुंडणावळ मंजूर करील.

---

## पॅरिसमध्ये ५०० न्यायाधीशांचा निषेध मोर्चा

फ्रान्समध्ये अधिकारारूढ असलेल्या गॉलिस्ट पक्षाच्या चिटणिसांनी तेथील न्यायाधीशांसंबंधी काढलेल्या उद्गारामुळे पॅरिसमध्ये मोठी खळबळ उडून गेली. फ्रान्समधील विद्यार्थी अनेकदा प्रक्षुब्ध निदर्शने करतात. अर्थातच त्यांच्या म्होरक्यांवर न्यायालयात जाब देण्यासाठी उभे राहण्याची पाळी येते. बंडखोर विद्यार्थ्यांवरील खटले चालविताना फ्रान्समधील न्यायाधीश भेकड वृत्ती दाखवितात असा आरोप गॉलिस्ट पक्षाच्या चिटणिसांनी केला. त्यामुळे चिडून पॅरिसमधील ५०० न्यायाधीशांनी आपली कोर्टे तासभर बंद केली आणि कोर्टात काम करताना वापरावयाचे काळे झगे घालून पॅरिसमधील न्यायालयाच्या प्रासादात निषेध मोर्चा काढला. त्यांच्या ह्या मोर्च्यात शेकडो वकील, हरकारे आणि कोर्टात काम करणारे कारकूनही सामील झाले होते. १९४२ साली नाझी अधिकाऱ्यांनी ठार मारलेल्या एका न्यायाधीशाच्या स्मृतिशिलेला त्यांनी वंदन केले.

## सर्व आशिआतच बेकारीचा कठीण प्रश्न

आशिआ आणि अतिपूर्व ह्या भूभागाच्या आर्थिक मंडळाने तयार केलेल्या अहवालाप्रमाणे आशिआतील देशांना इ. स. २,००० साल येण्याच्या सुमारास १०० कोटी नव्या रोजगारांची सोय करावी लागेल. तरच काम करू शकणाऱ्या धडधाकट लोकांना जगता येईल असा हिशेब मंडळाच्या लोकसंख्याविषयक तज्ज्ञांनी केला आहे. त्यांच्या हिशेबाप्रमाणे १५ ते ६४ वर्षे वयाची माणसे काम करण्यास लायक धरली तर आज आशिआतील अशा माणसांची संख्या ११५ कोटी इतकी आहे. १९८५ च्या सुमारास ही संख्या १६१·७ कोटींच्या घरात जाईल आणि २,००० च्या सुमारास हा आकडा २३० कोटी इतका प्रचंड होईल. श्रम करू शकणाऱ्या इतक्या मोठ्या लोकसंख्येला कामधंदा मिळू शकला नाही तर जगावर फार मोठी आपत्ती कोसळल्याशिवाय राहणार नाही. भारतामधील बेकारी ह्या संदर्भात विशेष अर्थपूर्ण ठरण्याची शक्यता आहे.

---

## वाचनालयाला फोर्ड फौंडेशनची मदत

तंजावर येथील सरस्वती महाल वाचनालय ह्या संस्थेला अमेरिकेतील फोर्ड फौंडेशन ह्या संघटनेकडून बहुमोल आर्थिक मदत मिळणार आहे. संघटनेच्या भारतामधील प्रमुखाने ह्या बाबतीत मद्रासच्या शिक्षणमंत्र्यांशी अलीकडेच चर्चा केली आहे. ह्या वाचनालयात बरीच जुनी हस्तलिखिते असून पैशाअभावी त्यांची योग्य काळजी घेतलेली नाही, त्यामुळे ती जीर्ण होऊन नष्ट होण्याचा धोका उत्पन्न झालेला आहे. ह्या दुर्मिळ हस्तलिखितांच्या पुन्हा प्रती करण्यासाठी आणि त्यांची भाषांतरे करण्यासाठी कित्येक दशकांचा अवधीही पुरा पडणार नाही. म्हणून सूक्ष्म चित्रपटांच्या साह्याने त्यांच्या नकला करून ठेवण्याची अतिशय आवश्यकता आहे. मद्रास राज्याच्या पुरातत्त्व खात्याला ह्याबद्दल तातडतोब उपाय योजण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

---

## पाकिस्तान चीनला जोडणारा नवा राजरस्ता

पाकिस्तान व चीन ह्यांना जोडणारा काराकोरम पर्वतराजीतून बांधण्यात आलेला रस्ता स्थापत्यशास्त्रातील कौशल्याचा एक नमुना ठरण्यासारखा आहे. हा राजरस्ता कोणत्याही ऋतूंत वापरता येईल असा आहे. नवीन रस्त्याच्या बहुतेक भागांवर दुहेरी वाहतूक चालण्याइतका तो रुंद असून त्यामुळे चीनमधून पाकिस्तानात माल पाठविणे सुलभ होईल. डोंगराळ भागातून नागमोडी वळणे घेत बांधलेल्या ह्या रस्त्यावर ५ टन वजनाची वाहने सहज वाहतूक करू शकतील. पेकिंगपासून तिबेटच्या राजधानीला जाण्याचा जो रस्ता आहे त्यापेक्षाही कराची मार्गे ल्हासाला जाणे नवीन रस्त्यामुळे अधिक सोयीस्कर झाले आहे असे म्हणतात.

---

## ठेवीदाराला कॅडिलॅक मोटार बक्षीस

अमेरिकेतील कित्येक बँका ठेवी आकर्षण्यासाठी ठेवीदारांना बक्षीसे देऊ लागल्या आहेत. उदाहरणार्थ, २५,००० डॉलर्स पाच वर्षे बिनव्याजी ठेवणारांना फर्स्ट स्टेट बँक ऑफ शिकॅगो एअर कंडिशन्ड कॅडिलॅक कॅले मोटार बक्षीस देते. ह्या गाडीची किंमत ७,००० डॉलर्स आहे. ह्याच अटीवर ७,७०० डॉलर्सची ठेव ठेवणारांना फोर्ड पिंटो मोटार बक्षीस मिळते. अर्थात, बुडणारे व्याज आणि बक्षीसाच्या किमतीवर द्यावा लागणारा सरकारी कर ह्यांचा हिशेब केला, तर ठेवीदारांच्या पदरात फायदा पडलेला आढळत नाही. २५,००० डॉलर्सच्या ठेवीवर ५$^3$ टक्के दराने ५ वर्षांचे व्याज ७,१८७ डॉलर्स होते, म्हणजे कॅडिलॅकच्या किमतीपेक्षा ते १८७ डॉलर्स अधिकच होते. अर्थात, याजावरही कर आकारला जातो. तेव्हा ठेवीदाराच्या प्राप्तीवर कोणत्या दराने कर आकारणी होते, ह्यावर ठेवीदाराला फायदा होतो किंवा नाही हे अवलंबून राहते.

---

## पाण्याच्या दुष्काळामुळे विवाह लांबणीवर

गोव्यातील काही खेडेगावांतील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई-मुळे तेथील मुलींची लग्ने लांबणीवर पडली आहेत. त्यांची लग्ने लावली तर ती खेडेगाव सोडून पतिगृही जातील आणि मग लांबून पाणी आणावे लागेल, ते कोण आणणार? लहानपणापासून डोक्यावरून पाणी आणण्याची सवय असणाऱ्या ह्या मुलींची जागा कोण घेणार? तेव्हा, त्यांचे पालक म्हणतात "पुढच्या वर्षी बघू."

---

## बी. बी. सी. वरील आरोपाची छाननी

कलाकारांच्या गाण्याच्या तबकड्या रेडिओवर लावण्यासाठी ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनचे अधिकारी कलाकारांचे पैसे आणि सेक्स ह्यांच्या मोहास बळी पडतात, ह्या आरोपाची चौकशी करण्यासाठी बी. बी. सी. ने एका बॅरिस्टराची नियुक्ती केली आहे. डॉरिस स्कायर्स ह्या ब्रिटिश गायिकेने ज्या वृत्तपत्रात ह्या गैरप्रकारांचा आरोप प्रसिद्ध झाला, त्या वृत्तपत्रावर ('न्यूज ऑफ दि वर्ल्ड' वर) अब्रुनुकसानीचा दावा लावला आहे.

---

## हिंदी लोकर गिरण्यांचा करारभंग?

आस्ट्रेलियाकडून घेतलेल्या लोकरीचे सुमारे ३.२४ कोटी रुपये हिंदी गिरण्यांनी दिलेले नाहीत. ही रक्कम त्यांनी देईपर्यंत ऑस्ट्रेलियाने भारताला कबूल केलेली लोकरीची देणगी देऊ नये असे तेथील लोकर निर्गत व्यापाऱ्यांनी सरकारला कळविले आहे. खरेदीचे करार केले त्या वेळेच्या मानाने आता किमती उतरल्या आहेत. त्यामुळे हिंदी गिरण्या करार पाळण्याचे टाळीत आहेत.

---


तारेचा पत्ता : "मॉर्गेज" | दूरध्वनी | मुख्य कार्यालय : २६७८०१, २६७८०२, २६७८०३
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट)
उपकार्यालय नं. १: २६०३०६ नं. २: २९०००६

# दि बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

(स्थापना १९३५)

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७० अखेर बँकेचे भागभांडवल ७ कोटी ८१ लाख, गंगाजळी ५६ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ३६ कोटी व येणे कर्ज १०४ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बेक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १६,३२,००,००० |
| ठेवी | रु. | ८१,१५,००,००० |
| खेळते भांडवल | रु. | १७०,९१,००,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.


सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

# मा. श्री. माधवराव गेनबा तावरे

## चेअरमन

## दि माळेगाव सहकारी साखर कारखाना लि.

नुकत्याच झालेल्या संचालक मंडळाच्या निवडणुकीमध्ये



बारामती तालुक्यातील माळेगाव येथील एक प्रगत शेतकरी व लोकप्रिय कार्यकर्ते श्री. माधवराव गेनबा तावरे यांची एकमताने कारखान्याचे चेअरमन म्हणून निवड झाली असून, ती योग्य अशीच आहे.

श्री. माधवरावजी तावरे यांचा कारखाना उभारणीच्या कामामध्ये फार मोठा वाटा असून कारखान्याच्या पहिल्या संचालक मंडळाचे ते संचालक होते. कारखाना उभारणीचे कामी भागभांडवल जमा करण्याकरिता श्री. माधवरावजी यांनी अतिशय परिश्रम घेतलेले आहेत. त्यांनी कारखान्याकरिता केलेली सेवा विचारात घेऊन कारखान्याचे सभासदांनी त्यांना दोन वेळा प्रचंड बहुमताने संचालक मंडळावर निवडून दिले असून, त्यांच्यावरील दृढ विश्वास व्यक्त केला आहे.

श्री. माधवरावजी तावरे यांचे कार्य साखर कारखान्यापुरतेच मर्यादित नसून माळेगाव बुद्रुक येथील शिक्षण सेवा मंडळाने चालविलेल्या हायस्कूलच्या कामीही त्यांनी प्रथमपासूनच जिद्दीने भाग घेतलेला आहे. याशिवाय माळेगाव बुद्रुक विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या स्थापनेत त्यांचा फार मोठा वाटा आहे.

पुणे जिल्हा परिषदेवरही त्यांना या भागातील जनतेने निवडून दिले होते, आणि त्या ठिकाणी शिक्षण समितीवर त्यांनी चांगल्या तऱ्हेने काम केले आहे. श्री. माधवरावजी हे नुसतेच कार्यकर्ते नसून ते सुप्रसिद्ध असे द्राक्ष व ऊस बागायतदारही आहेत. स्वत: शेतीचा व्यवसाय संभाळून जास्तीत जास्त लोकसेवा करण्यात ते संतत गुंतलेले असतात. श्री. माधवरावजी तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली माळेगाव सहकारी साखर कारखान्याची सर्वांगीण उन्नती होईल असा दृढ विश्वास सभासदांमध्ये निर्माण झालेला आहे.

---

**विमानाने प्रवास करणाऱ्यांची झडती**—काश्मीरमधील दोन चाच्यांनी एक हिंदी विमान जबरदस्तीने पळवून नेल्यापासून विमानाने प्रवास करणारांची कसून झडती घेण्यात येऊ लागली. कलकत्ता येथील विमानतळावर प्रवाशांची झडती घेऊ लागल्यापासून १४ पिस्तुले अगर रिव्हॉल्व्हर्स उघडकीस आली. एक प्रवासी सोडून इतरांजवळ परवाने होते. सर्व हत्यारे विमानांच्या कमांडरकडे देण्यात आली.

### व्हिएटनाममधील युद्धाचे विपरीत अर्थशास्त्र

कोलंबिआ विद्यापीठातील एका नामवंत प्राध्यापकाने अमेरिकेने व्हिएटनाममधील युद्धावर दरमहा चालविलेल्या खर्चात काय काय करता येईल ह्याचे चित्र रेखाटले आहे. ते असे : युद्धावरील दरमहाच्या खर्चात ( १ ) १ कोटी भुकेल्या अमेरिकनांना अन्न देता येईल. ( २ ) आंतरराष्ट्रीय विकास संघटनेजवळील पैशात दुपटीपेक्षा अधिक वाढ करता येईल. ( ३ ) रॉकफेलर फौंडेशन-सारख्या चार मदत संस्था स्थापन करता येतील. ( ४ ) अमेरिकेतील राज्यांचा व स्थानिक संस्थांचा पोलिसांवर होणारा सबंध एक वर्षाचा खर्च भागविता येईल. ( ५ ) सध्या दोन कोटी अमेरिकन नागरिकांना सामाजिक सुरक्षिततेच्या योजनांच्या द्वारे ज्या सोयी-सवलती पुरविल्या जातात त्यात दुपटीपेक्षाही अधिक वाढ करता येईल. युद्धावरील अनुत्पादक खर्च बंद झाला तरच हे शक्य होणार आहे.

---

### ज्युलिआना राणीची देणगी

हॉलंडच्या ज्युलिआना राणीने वर्ल्ड कौन्सिल ऑफ चर्चेस फंडाला २० लक्ष रुपयांचा चेक देणगीदाखल पाठविला आहे. आफ्रिकेतील गोऱ्यांविरुद्ध लढत देणाऱ्यांना ह्या फंडातून मदत मिळते. १८५७ सालच्या भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचे वेळी ग्रेट ब्रिटनच्या व्हिक्टोरिया राणीने भारतीयांच्या उठावाला पैशांची मदत केली असती, तशीच ही परिस्थिती आहे. आफ्रिकेतील बहुसंख्य श्वेतवर्णीयांचे पूर्वज हॉलंडमधून आलेले आहेत. ज्युलिआना राणीची ही देणगी त्यांच्या शत्रूला दिलेली मदतच होय, असे ते मानतात.

---


Statement about ownership and other particulars about newspaper 'ARTHA' to be published in the first issue every year after last day of February.

FORM IV

(See Rule 8)

| | | |
|---|---|---|
| 1. | Place of publication | 823, Shivajinagar, Poona 4 |
| 2. | Periodicity of its publication | Fortnightly |
| 3. | Printer's name | S. V. Kale |
| | Nationality | Indian |
| | Address | 823, Shivajinagar, Poona 4 |
| 4. | Publisher's name | S. V. Kale |
| | Nationality | Indian |
| | Address | 823, Shivajinagar, Poona 4 |
| 5. | Editor's name | S. V. Kale |
| | Nationality | Indian |
| | Address | 823, Shivajinagar, Poona 4 |
| 6. | Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital | S. V. Kale<br>823 Shivajinagar<br>Poona 4 |

I, Shripad Vaman Kale, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 3-3-1971

S. V. Kale

Signature of Publisher.


---

## चांगल्या जमिनींचा गैरफायदा घेऊ नका

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेती उपसंघटनेतर्फे दिल्ली येथे शेतजमिनींची पाहाणी आणि कस ह्या विषयासंबंधी विचार करण्यासाठी एक आंतरराष्ट्रीय परिषद भरविण्यात आली होती. परिषदेसाठी आग्नेय आशियातील अनेक देशांचे शेतजमीन तज्ज्ञ आले होते. सहा दिवस चाललेल्या ह्या परिसंवादात भारत सरकारच्या शेती खात्याचे चिटणीस श्री. टी. पी. सिंग ह्यांनी शेतीच्या उत्पादनवाढीच्या योजनातील एका महत्त्वाच्या बाबीकडे लक्ष वेधले. ते म्हणाले, की ज्या देशांच्या अर्थव्यवस्थेत शेतीला प्रमुख स्थान आहे त्या देशांनी उत्पादनवाढीवर आपले लक्ष केंद्रित केले आहे. परंतु, ह्यामुळे एक नवा धोका उत्पन्न झालेला आहे. सकस जमिनीतून थोड्या अवधीत भरघोस पिके घेण्याची वृत्ती वाढीस लागलेली आहे. ह्या पद्धतीमुळे अशा जमिनींची दीर्घकालीन उत्पादनक्षमता कमी होत जाण्याचा धोका आहे. आधुनिक शेती यशस्वी करण्यासाठी एकरी जास्त पिके देणारी बियाणे, पाण्याच्या वापराच्या पद्धती, खताचा वापर ह्यांविषयी भरपूर माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर जमिनींचा कस, निरनिराळ्या प्रकारच्या जमिनींची उत्पादनक्षमता, त्यात घेता येण्यासारखी पिके, इत्यादी बाबींसंबंधीही माहितीचा प्रसार झाला पाहिजे. जमिनीच्या प्रतीविषयी परीक्षा करून घेण्याच्या सोयी आता उपलब्ध झालेल्या आहेत. परंतु ह्या व्यवस्थेचा शेतीवर अद्याप फारसा परिणाम झालेला दिसत नाही. शेतकी-शास्त्रज्ञ आणि शेतकरी ह्यांच्या कामात एकसूत्रता आणून शेती समृद्ध करण्याचा जोरकस उपक्रम अजून झालेला नाही.

---

## मध्य प्रदेशातील नलिकाकूप योजना

पावसावर अवलंबून असणाऱ्या जिराइत शेतीला हुकमी पाणीपुरवठा मिळाल्यास तिचे स्वरूपच पालटते. असा हुकमी पाणीपुरवठा करण्याचे एक साधन म्हणून नलिकाकूपांना साहजिकच महत्त्व आहे. ज्या पिकांना ठराविक वेळाने पाणी द्यावेच लागते त्यांना अशा विहिरी म्हणजे वरदानच ठरते. मध्य प्रदेश सरकारने डच सरकारच्या मदतीने अशा विहिरी खोदण्याचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. कार्यक्रमात आतापर्यंत ३२३ विहिरी खोदल्या गेल्या. त्यांपैकी २०० यशस्वी ठरलेल्या आहेत. एखादी विहीर यशस्वी तेव्हाच समजण्यात येते की ज्यावेळी तीमधून दर तासाला किमान १,५०० गॅलन पाणी उपसता येणे शक्य होते. विहिरी खोदण्याच्या कामाला १९६६ साली एक तातडीची योजना म्हणून प्रारंभ करण्यात आला. पण नंतर एफ्. ए. ओ संघटनेच्या नेतृत्वाखाली तिला काही प्रमाणात कायमचे स्वरूप देण्यात आले. डच सरकार भारताला खताच्या रूपाने भांडवलाचा पुरवठा करीत होते. हे खत भारतात विकण्यात येऊन आलेला पैसा विहिरी खोदण्याच्या कामाला देण्यात येऊ लागला. नंतर इंडिअन वॉटर डेव्हलपमेंट सोसायटीची स्थापना झाली. आता ह्या सोसायटीकडे नलिकाविहिरी खोदण्याचा कारभार सोपविण्यात आलेला आहे. एक नलिकाकूप खोदण्यासाठी पंप, नळ इत्यादी साधनांसह १५ ते २० हजार रुपये खर्च येतो. अर्थातच छोट्या शेतकऱ्याला विहीर खोदण्याचा खर्च झेपण्यासारखा नसतो. त्यामुळे ह्या योजनेखाली मध्य प्रदेशात अवघ्या ३,८०० एकर जमिनीलाच पाणीपुरवठा करण्यात येतो. भूमिगत पाण्याचे अधिक साठे संशोधनाअंती उपलब्ध झाले तर आणखी विहिरी खोदता येतील, आणि सुमारे ८ लाख एकर जमीन ओलिताखाली आणता येईल असा अंदाज आहे.

## मुंबई बंदराच्या विकासासंबंधी ऐतिहासिक प्रबंध

मुंबई बंदराच्या विकासासंबंधी ऐतिहासिकदृष्ट्या माहिती देऊन चिकित्सा करणारा एक प्रबंध शहरांतील एका प्राध्यापकाने मुंबई विद्यापीठाकडे पाठविला असून त्याला विद्यापीठाने मान्यता दिली आहे. प्रबंधातील माहितीप्रमाणे मुंबई बंदर सध्याच्या अवस्थेपर्यंत येण्यास दोन प्रकारची कारणे घडली. मुंबई बंदराचा विकास होऊ लागण्यापूर्वी उत्तर कोकणात आंतरराष्ट्रीय व्यापार करणारी चार बंदरे होती. सोपारा, कल्याण, ठाणे आणि वसई ही त्यांची नावे. ह्या चारही बंदरांत वाळू साठून तेथील पाण्याची खोली कमी झालेली होती. त्यामुळे ती हळूहळू मागे पडत चालली होती. ह्याच वेळी ब्रिटिश दर्यावर्दींच्या दूरदृष्टीला मुंबई येथील छोट्या बंदराचा विकास घडवून आणण्याची स्वप्ने पडत होती. सन १६६१ साली पोर्तुगीज सरकारने ब्रिटिश कंपनीला मुंबईचा ताबा दिला आणि आपले लक्ष वसई बंदरावर केंद्रित केले. त्या वेळी मुंबई हे मुख्यतः कोळ्यांच्या वस्तीचे एक छोटेसे खेडे होते. त्याची लोकसंख्या अवघी १८,००० होती. उत्तर कोकणातील सोपारा बंदर हे खिस्तशकापूर्वी ४थ्या शतकाच्या सुमारास निकामी झालेले होते. कल्याण, ठाणे आणि वसई ही तीन बंदरे मात्र अनुक्रमे ११ व्या, १४ व्या व १८ व्या शतकांपर्यंत आंतरराष्ट्रीय बंदरे म्हणून राहिली. १६७४ मध्ये मुंबईचा गव्हर्नर असलेल्या मि. जिराल्ड ऑंजिअर ह्याने मुंबईचा विकास घडवून आणण्याच्या योजनेला हात घातला. इतर कोणत्याही युरोपीय लोकांपेक्षा ब्रिटिशांना भारतात भक्कम पाया रोवण्याची अधिक शक्यता आहे असे त्याने लिहून ठेवलेले आढळते. मुंबईवर स्वामित्व मिळाल्यावर राज्यकारभार, कायदा, न्यायदान, नाणी पाडणे, जहाजे बांधणे, इत्यादी बाबतीत त्याने काम करण्यास प्रारंभ केला.

---

## क्रिकेटपटू सरदेसाईला २,२५० रु.चे बक्षीस

भारत—वेस्ट इंडीज क्रिकेट कसोटी सामन्यात सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रत्येकी २५० जमेकन डॉलर्सचे म्हणजे २,२५० रुपयांचे बार्कलेज सरदेसाई आणि रोशन कन्हाई ह्यांना मिळाले आहे. सरदेसाईने २१२ धावा काढल्या; कन्हाईने पहिल्या डावात सर्वाधिक म्हणजे ५७ आणि दुसऱ्या डावात नाबाद १५८ धावा काढल्या.

SCG-1 HIN

# नहीं–
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुवदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**




## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

२८ विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: [illegible]




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेकन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)